MHKO030049102013

दाखल दिनांक - २८/१०/२०१३.

नोंदणी दिनांक - २८/१०/२०१३.

निकाल दिनांक - १६/०५/२०२६.

कालावधी - वर्षे महिना दिवस.

**१२ ०६ १८.**

## <u>प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.१४ कोल्हापूर यांचे न्यायालयात</u>

**<u>( पिठासीन अधिकारी: श्रीमती शिल्पा वि. कुलकर्णी )</u>,**

**<u>नि.फौ.ख.क्र.८२४/२०१३.</u>** **<u>निशाणी क्रमांक ११३१/ब.</u>**

**<u>गु.र.क्र.१०७/२०१२.</u>**

**दोषारोप** – भा.दं.वि.सं.कलम ४६५, ४६९, ४७१ सह कलम ३४ प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| **फिर्यादी** | | महाराष्ट्र सरकार तर्फे<br>पोलीस ठाणे अधिकारी,<br>**लक्ष्मीपुरी पोलीस ठाणे, कोल्हापुर.** |
| अभियोग पक्षातर्फे सरकारी अभियोक्ता | | श्री.एस.जे.सरनोबत. |
| **आरोपी** | | **१. राहुल विश्वनाथ परब,**<br>व.व.३०, धंदा - लिपीक,<br>रा.प्लॉट न.१ मुक्त सैनिक वसाहत, कोल्हापूर.<br>**२. अभिजीत आनंदराव पाटील,**<br>व.व.२९, धंदा - लिपीक,<br>रा.नेर्ली तामगांव, ता.करवीर, जि.कोल्हापूर.<br>**३. समीर रामचंद्र पाटील,**<br>व.व.२७, धंदा - शेती, |

| | | |
|---|---|---|
| | | रा.निढोरी, ता.कागल,<br>जि.कोल्हापूर.<br>**४. विलास दादु कुंभार,**<br>व.व.४४, धंदा - शेती,<br>रा.वाधापूर, ता.भुदरगड,<br>जि.कोल्हापूर.<br>**५. कृष्णात शंकर सावंत,**<br>व.व.५०, धंदा - शेती,<br>रा.नरतवडे, ता.राधानगरी,<br>जि.कोल्हापूर.<br>**६. विष्णू परशुराम बागडी,**<br>व.व.४१, धंदा - शिक्षक,<br>रा.घर न.१०४२,वाशीनाका, कोल्हापूर.<br>**७. पुजा भाउसो उपाध्ये,**<br>व.व.३६, धंदा - शिक्षक,<br>रा.४७, डी वॉर्ड, गंगावेश, कोल्हापूर.<br>**८. अभिजीत प्रफुल्ल चिटनीस,**<br>व.व.२७, धंदा - शिक्षण,<br>रा.लक्षतीर्थ वसाहत, शेवट बस स्टॉप,कोल्हापूर.<br>**९. सुभाष रामचंद्र कांबळे,**<br>व.व.३८, धंदा - नोकरी,<br>रा.नावली, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर.<br>**१०. सुरज संभाजी चौगुले,**<br>व.व.२०, धंदा - शिक्षण,<br>रा.नरतवडे, ता.राधानगरी,<br>जि.कोल्हापूर.<br>**११. गोरखनाथ गंगाराम पाटील,**<br>व.व.३९, धंदा - नोकरी,<br>रा.नागांव, ता.हातकणंगले,<br>जि.कोल्हापूर. |

| | | |
|---|---|---|
| | | **१२. सुधीर राजाराम फराकटे,**<br>व.व.२२, धंदा - शेती,<br>रा.फराकटेवाडी, ता.कागल,<br>जि.कोल्हापूर.<br>**१३. युवराज शामराव ठाणेकर,**<br>व.व.३०, धंदा - शेती,<br>रा.गाडेगोंडवाडी, ता.करवीर,<br>जि.कोल्हापूर.<br>**१४. संग्राम दिनकर पाटील,**<br>व.व.२२, धंदा - शेती<br>रा.हेरवडे खालसा, ता.करवीर,<br>जि.कोल्हापूर.<br>**१५. सुभाष दत्तात्रय सुर्यवंशी,**<br>व.व.४०, धंदा - मजुरी,<br>रा.कासारपूतळी, ता.राधानगरी,<br>जि.कोल्हापूर.<br>**१६. लक्ष्मण ज्ञानु जाधव,**<br>व.व.३२, धंदा - मजुरी,<br>रा.यवलुज, ता.पन्हाळा,<br>जि.कोल्हापूर.<br>**१७. विद्यासागर परशुराम किर्तीकर,**<br>व.व.३७, धंदा - नाभीक ,<br>रा.हेगडे गल्ली, पट्टणकोडीली,<br>ता.हातकणंगले,जि.कोल्हापूर.<br>**१८. अशोक धोंडीराम पाटील,**<br>व.व.४०, धंदा - मजुरी,<br>रा.कपिलेश्वर, ता.राधानगरी,<br>जि.कोल्हापूर.<br>**१९. बाबुराव गणपती पाटील,**<br>व.व.३६, धंदा - शेती,<br>रा.कासारपुतळी, ता.राधानगरी, |

| | | |
|---|---|---|
| | | जि.कोल्हापूर.<br>**२०. युवराज शिवाजी तौंदकर,**<br>व.व.३०, धंदा - शेती,<br>रा.कपिलेश्वर, ता.राधानगरी,<br>जि.कोल्हापूर.<br>**२१. संजय महीपती चौगुले,**<br>व.व.३२, धंदा - शेती,<br>रा.कापशी,ता.शाहुवाडी, जि.कोल्हापूर.<br>**२२. विक्रम नारायण पाटील,**<br>व.व.२९, धंदा - शेती,<br>रा.भेडसगाव, ता.शाहुवाडी,<br>जि.कोल्हापूर.<br>**२३. विजयकुमार मारुतराव चौगुले,**<br>व.व.३७, धंदा - शेती,<br>रा.ठिपकुर्ली, ता. राधानगरी,<br>जि.कोल्हापूर.<br>**२४. रविंद्र बाबूराव जंगम,**<br>व.व.३८, धंदा - सरकारी नोकरी,<br>रा.नवीन वसाहत, पेठवडगांव ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर.<br>**२५. ज्ञानदेव यशवंत फासके,**<br>व.व.३८, धंदा - शेती,<br>रा.उंदरवाडी,ता.कागल, जि.कोल्हापूर.<br>**२६. सुधाकर सात्ताप्पा पाटील,**<br>व.व.३६, धंदा - शेती,<br>रा.उंदरवाडी,ता.कागल, जि.कोल्हापूर.<br>**२७. सदाशिव मारुती भोसले,**<br>व.व.३८, धंदा - शेती,<br>रा.कळकवाडी, ता.राधानगरी,<br>जि.कोल्हापूर. |

| | | |
|---|---|---|
| | | **२८. विकास दिनकर खाडे,**<br>व.व.३१, धंदा - शेती,<br>रा.मल्लेवाडी,ता.राधानगरी,<br>जि.कोल्हापूर.<br>**२९. इंद्रजित मारुती आबिटकर,**<br>व.व.३८, धंदा - नोकरी,<br>रा.सोनाळी, ता.भुदरगड,<br>जि.कोल्हापूर.<br>**३०. दत्तात्रय बळवंत पाटील,**<br>व.व.४७, धंदा - नोकरी,<br>रा.सोळांकुंर, ता.राधानगरी,<br>जि.कोल्हापूर.<br>**३१. सचिन आनंदराव जाधव,**<br>व.व.३३, धंदा - नोकरी,<br>रा.सोळांकुंर, ता.राधानगरी,<br>जि.कोल्हापूर.<br>**३२. धीरज धनाजी पाटील,**<br>व.व.२०, धंदा - शिक्षण,<br>रा.सोळांकुंर, ता.राधानगरी,<br>जि.कोल्हापूर.<br>**३३. विक्रम शिवाजी यादव,**<br>व.व.२६, धंदा - शेती,<br>रा.द-याचे वडगांव, भटवाडी ता.करवीर,<br>जि.कोल्हापूर.<br>**३४. नाथाजी तुकाराम पाटील,**<br>व.व.३३, धंदा - शेती,<br>रा.आकुर्डे, पाटील गल्ली, ता.भुदरगड,<br>जि.कोल्हापूर.<br>**३५. सचिन धोंडीराम शिंदे,**<br>व.व.३०, धंदा - शेती,<br>रा.नुल, ता.गडहिंग्लज, |

| | | |
|---|---|---|
| | | जि.कोल्हापूर.<br>**३६.उमेश उर्फ उमाजी बचाराम चव्हाण,**<br>व.व.३४, धंदा - नोकरी,<br>रा.खानापुर, ता.भुदरगड,<br>जि.कोल्हापूर.<br>**३७. श्रीबाला धनाजी पाटील,**<br>व.व.३३, धंदा - शिक्षक,<br>रा.दोनवडे, ता.करवीर,<br>जि.कोल्हापूर.<br>**३८. सुनिल दिनकर पाटील,**<br>व.व.३६, धंदा - शेती,<br>रा.क.तारळे, ता.राधानगरी,<br>जि.कोल्हापूर.<br>**३९. प्रकाश गणपती पोटजाळे,**<br>व.व.५४, धंदा - -,<br>रा.गीजवणे, ता.गडहिंग्लज,<br>जि.कोल्हापूर.<br>**४०. राजेंद्र शंकरराव साळुंखे,**<br>व.व.३६, धंदा - शेती,<br>रा.नागणवाडी, पोष्ट पिंपळगाव<br>ता.भुदरगड ,जि.कोल्हापूर.<br>**४१. सचिन गणेश पवार,**<br>व.व.२२, धंदा - नोकरी,<br>रा.वेंगरुळ, ता.भुदरगड,<br>जि.कोल्हापूर.<br>**४२. पांडूरंग आनंदा पाटील,**<br>व.व.३५, धंदा - नोकरी,<br>रा.आसुर्ले, ता.पन्हाळा,<br>जि.कोल्हापूर.<br>**४३. रमेश दामोदर चव्हाण,**<br>व.व.३३, धंदा - नोकरी, |

| | | |
|---|---|---|
| | | रा.पार्वती पार्क, प्लॉट नं.९, कळंबा रोड,<br>जि.कोल्हापूर.<br>**४४. सागर विलास जाधव,**<br>व.व.२३, धंदा - नोकरी,<br>रा.सोळाकुंर, ता.राधानगरी,<br>जि.कोल्हापूर.<br>**४५. परवीन रियाज अहमद चौगले,**<br>व.व.३६, धंदा - शिक्षीका,<br>रा.औरवाड, ता.शिरोळ,<br>जि.कोल्हापूर.<br>**४६. अंकुश बाबासो मगदुम,**<br>व.व.२२, धंदा - नोकरी,<br>रा.निढोरी, ता.कागल,<br>जि.कोल्हापूर.<br>**४७. विनायक बापूसो बुगडे,**<br>व.व.१९, धंदा - नोकरी,<br>रा.निढोरी, ता.कागल,<br>जि.कोल्हापूर.<br>**४८. उशाताई सदाशिव पवार,**<br>व.व.३१, धंदा - घरकाम,<br>रा.भामटे, ता.करवीर,<br>जि.कोल्हापूर.<br>**४९. एकनाथ चंदर पाटील,(मयत)**<br>व.व.४९, धंदा - नोकरी,<br>रा.बाचणी, ता.करवीर,<br>जि.कोल्हापूर.<br>**५०. संदेभ बाबुराव बागडी,**<br>व.व.४१, धंदा - डॉक्टर,<br>रा.कर्ण हॉस्पीटल, दुधाळी, ता.करवीर,<br>जि.कोल्हापूर. |

| | | |
|---|---|---|
| | | **५१. संग्राम रामदास कदम,**<br>व.व.२१, धंदा - शिक्षण,<br>रा.नरतवडे, ता.राधानगरी,<br>जि.कोल्हापूर.<br>**५२. शरद ज्ञानदेव गुरव,**<br>व.व.३२, धंदा - नोकरी,<br>रा.सोळाकुंर, ता.राधानगरी,<br>जि.कोल्हापूर.<br>**५३. संतोष श्रीपती चव्हाण,**<br>व.व.४२, धंदा - नोकरी,<br>रा.सोळाकुंर, ता.राधानगरी,<br>जि.कोल्हापूर.<br>**५४. पांडूरंग आनंदा नायकवडे,**<br>व.व.३५, धंदा - शेती,<br>रा.पंडेवाडी, ता.राधानगरी,<br>जि.कोल्हापूर.<br>**५५. देवयानी संजय पाटील,**<br>व.व.२९, धंदा - अंगणवाडी सेविका,<br>रा.किटवडे, ता.आजरा,<br>जि.कोल्हापूर.<br>**५६. संजय सदाशिव कुंभार,**<br>व.व.४०, धंदा -<br>रा.सरुड, ता.शाहुवाडी,<br>जि.कोल्हापूर.<br>**५७. सागर यशवंत वाळवेकर,**<br>व.व.३०, धंदा - नोकरी,<br>रा.कुंभारवाडी, ता.राधानगरी,<br>जि.कोल्हापूर.<br>**५८. दिलीप बापूसो कदम,**<br>व.व.४१, धंदा - नोकरी,<br>रा.कंतेवाडी, ता.राधानगरी, |

| | | |
|---|---|---|
| | | जि.कोल्हापूर.<br>**५९. अपर्णा धोंडीराम तायशेटे,**<br>व.व.२०, धंदा - शिक्षण,<br>रा.पिरळ, ता.राधानगरी,<br>जि.कोल्हापूर.<br>**६०. संजय रामचंद्र टिपूगडे,**<br>व.व.३५, धंदा - व्यवसाय,<br>रा.पिरळ,ता.राधानगरी,<br>जि.कोल्हापूर.<br>**६१. महादेव दगडु गोते,**<br>व.व.३१, धंदा - व्यवसाय,<br>रा.क.बीड,ता.करवीर,<br>जि.कोल्हापूर.<br>**६२. मेघाताई सुखदेव पांडे उर्फ कु. मेघाताई निवृत्ती पन्हाळकर,**<br>व.व.२५, धंदा - घरकाम,<br>रा.सारवडे, पाटणकर, ता.राधानगरी,<br>जि.कोल्हापूर.<br>**६३. सुशिलकुमार यशवंत डवरी,**<br>व.व.३१, धंदा - व्यवसाय,<br>रा.फणसवाडी, ता.भुदरगड,<br>जि.कोल्हापूर.<br>**६४. महादेव गुंडाप्पा महाजन,**<br>व.व.३६, धंदा - नोकरी,<br>रा.पनुत्रे, ता.पन्हाळा,<br>जि.कोल्हापूर.<br>**६५. युवराज राजाराम पाटील,**<br>व.व.३४, धंदा - नोकरी,<br>रा.मांगनुर, ता.कागल,<br>जि.कोल्हापूर. |

| | | |
|---|---|---|
| | | **६६. मोशे दादासो भोरे,**<br>व.व.२९, धंदा - नोकरी,<br>रा.नरंदे, ता.हातकणंगले,<br>जि.कोल्हापूर.<br>**६७. संग्राम शिवाजी शिंदे,**<br>व.व.२३, धंदा - नोकरी,<br>रा.पाल, ता.भुदरगड,<br>जि.कोल्हापूर.<br>**६८. शहाजी शंकर कदम,**<br>व.व.३४, धंदा - वायरमन,<br>रा.सरवडे, ता.राधानगरी,<br>जि.कोल्हापूर.<br>**६९. प्रदीप शंकर पाटील,**<br>व.व.२४, धंदा - शेती,<br>रा.मुदाळ, ता.भुदरगड,<br>जि.कोल्हापूर.<br>**७०. मारुती राजाराम पाटील,**<br>व.व.३३, धंदा - नोकरी,<br>रा.मुदाळ, ता.भुदरगड,<br>जि.कोल्हापूर.<br>**७१. नारायण सत्तु लाली,**<br>व.व.३६, धंदा - नोकरी,<br>रा.पट्टनकोडोली, ता.हातकणंगले,<br>जि.कोल्हापूर.<br>**७२. सुरज शिवाजी कुदळे,**<br>व.व.२०, धंदा - शेती,<br>रा.तळाशी, ता.राधानगरी,<br>जि.कोल्हापूर.<br>**७३. विनायक वसंत मगदुम,**<br>व.व.२१, धंदा - शिक्षण,<br>रा.नरतवडे, ता.राधानगरी, |

| | | |
|---|---|---|
| | | जि.कोल्हापूर.<br>**७४. अविनाश देवीदास गवते,**<br>व.व.३५, धंदा - शेती,<br>रा.केळोशी, ता.राधानगरी,<br>जि.कोल्हापूर.<br>**७५. हर्षद मारुती पाटील,**<br>व.व.२१, धंदा - शिक्षण,<br>रा.अकनुर, ता.राधानगरी,<br>जि.कोल्हापूर.<br>**७६. रामचंद्र शामराव चव्हाण,**<br>व.व.३७, धंदा - शेती,<br>रा.खानापुर, ता.भुदरगड,<br>जि.कोल्हापूर.<br>**७७. सुमन दत्तात्रय कांबळे,**<br>व.व.३९, धंदा - नोकरी,<br>रा.कोनवडे, ता.भुदरगड,<br>जि.कोल्हापूर.<br>**७८. संतोष बाजीराव पाटील,**<br>व.व.३०, धंदा - नोकरी,<br>रा.नाधवडे, ता.भुदरगड,<br>जि.कोल्हापूर.<br>**७९. संदिन गजानन कुलकर्णी,**<br>व.व.३९, धंदा - नोकरी,<br>रा.बोरवडे, ता.कागल,<br>जि.कोल्हापूर.<br>**८०. सचिन पांडुरंग कुदळे,**<br>व.व.२७, धंदा - नोकरी,<br>रा.उंदरवाडी, ता.कागल,<br>जि.कोल्हापूर.<br>**८१. युवराज राजाराम देसाई,**<br>व.व.२८, धंदा - नोकरी, |

| | | |
|---|---|---|
| | | रा.लिंगनुर, ता.गडहिंग्लज,<br>जि.कोल्हापूर.<br>**८२. चेतन नामदेव चौगुले,**<br>व.व.२७, धंदा - नोकरी,<br>रा.शिवरे, ता.शाहुवाडी,<br>जि.कोल्हापूर.<br>**८३. संग्राम हरी पाटील,**<br>व.व.२५, धंदा - नोकरी,<br>रा.मालवे, पो.सरवडे, ता.राधानगरी,<br>जि.कोल्हापूर.<br>**८४. सागर दिनकर जाधव,**<br>व.व.२९, धंदा - नोकरी,<br>रा.मांगोली, ता.राधानगरी,<br>जि.कोल्हापूर.<br>**८५. उज्वला आनंदराव पाटील,**<br>व.व.३२, धंदा - घरकाम,<br>रा.मांगोली, ता.राधानगरी,<br>जि.कोल्हापूर.<br>**८६. दिपक मारुती पाटील,**<br>व.व.२०, धंदा - नोकरी,<br>रा.नरतवडे, ता.राधानगरी,<br>जि.कोल्हापूर.<br>**८७. सुभाष आण्णा चौगुले,**<br>व.व.३१, धंदा - नोकरी,<br>रा.कापशी, ता.राधानगरी,<br>जि.कोल्हापूर.<br>**८८. सतीश साताप्पा कळमकर,**<br>व.व.२२, धंदा - नोकरी,<br>रा.निढोरी, ता.कागल,<br>जि.कोल्हापूर. |

| | | |
|---|---|---|
| | | **८९. वैभव एकनाथ कळमकर,**<br>व.व.२७, धंदा - नोकरी,<br>रा.निढोरी, ता.कागल,<br>जि.कोल्हापूर.<br>**९०. शिवाजी बळवंत लोकरे,**<br>व.व.४०, धंदा - नोकरी,<br>रा.अकनुर, ता.राधानगरी,<br>जि.कोल्हापूर.<br>**९१. विवेक बाबसो पाटील,**<br>व.व.१९, धंदा - शिक्षण,<br>रा.कुर, ता.भुदरगड,<br>जि.कोल्हापूर.<br>**९२. वैभव तानाजी पाटील,**<br>व.व.१९, धंदा - शिक्षण,<br>रा.कोनवडे, ता.भुदरगड,<br>जि.कोल्हापूर.<br>**९३. जगन्नाथ तुकाराम पाटील,**<br>व.व.३३, धंदा - नोकरी,<br>रा.सुप्रभात कॉलनी, आपटे नगर, कोल्हापूर.<br>**९४. शोभा राजेंद्र किनींगे,**<br>व.व.३९, धंदा -<br>रा.किनी, ता.हातकणंगले,<br>जि. कोल्हापूर.<br>**९५. रिमा राजेंद्र घाटगे,**<br>व.व.४५, धंदा - नोकरी,<br>रा.लक्षतिर्थ वसाहत, कोल्हापूर.<br>**९६. सचिन कोंडीराम पाटील,**<br>व.व.३८, धंदा - नोकरी,<br>रा.नेहरुनगर आयसोलेशन हॉस्पीटल, कोल्हापूर. |

**९७. विनायक पुंडलिक गावडे,**
व.व.३०, धंदा - नोकरी,
रा.कानुर खुर्द, ता.चंदगड,
जि.कोल्हापूर.
**९८. प्रतिक प्रकाश गोटे,**
व.व.२१, धंदा - नोकरी,
रा.बोरवडे, ता.कागल,
जि.कोल्हापूर.
**९९. उमेश केरबा बिडकर,**
व.व.३९, धंदा - नोकरी,
रा.आदर्श अपार्टमेंट, शाहुपूरी,
कोल्हापूर.
**१००. विनायक विठ्ठल कांबळे,**
व.व.२४, धंदा - नोकरी,
रा.कासारी, ता.कागल,
जि.कोल्हापूर.
**१०१. राहुल पांडूरंग पाटील,**
व.व.२५, धंदा - नोकरी,
रा.कोनवडे, ता.भुदरगड,
जि.कोल्हापूर.
**१०२. दिपाली बाबुराव शिंदे,**
व.व.२९, धंदा - नोकरी,
रा.चर्च रोड, ता.गडहिंग्लज,
जि.कोल्हापूर.
**१०३. सुभाष केरबा कातीवले,**
व.व.२५, धंदा - नोकरी,
रा.घोटवडे, ता.राधानगरी,
जि.कोल्हापूर.
**१०४. वंदना दिलीप कांबळे,**
व.व.३८, धंदा - नोकरी,
रा.अवधुत कॉलनी, गारगोटी,

| | | |
|---|---|---|
| | | ता.भुदरगड,जि.कोल्हापूर.<br>**१०५. अशोक कृष्णा निगंनुरे,**<br>व.व.४३, धंदा - नोकरी,<br>रा.ए वॉर्ड, शिवाजीपेठ, जि.कोल्हापूर.<br>**१०६. अमर गुंडा चोरगे,**<br>व.व.२३, धंदा - नोकरी,<br>रा.कोलोली, ता.पन्हाळा,<br>जि.कोल्हापूर.<br>**१०७. गणपती शामराव पाटील,**<br>व.व.२८, धंदा - नोकरी,<br>रा.शिंपे, ता.शाहुवाडी,<br>जि.कोल्हापूर.<br>**१०८. संदिप बजरंग बुरुड,**<br>व.व.२९, धंदा - नोकरी,<br>रा.क.तारळे, ता.राधानगरी,<br>जि.कोल्हापूर.<br>**१०९. अजित आनंदा पाटील,**<br>व.व.३३, धंदा - नोकरी,<br>रा.कळे, ता.पन्हाळा,<br>जि.कोल्हापूर.<br>**११०. किरण वसंतराव चौगुले,**<br>व.व.३१, धंदा - नोकरी,<br>रा.आरे, ता.करवीर,<br>जि.कोल्हापूर.<br>**१११. सुभाष जिवाप्पा पाटील,**<br>व.व.३७, धंदा - नोकरी,<br>रा.सुरुते, ता.चंदगड,<br>जि.कोल्हापूर.<br>**११२. विजय एकनाथ उबाळे,**<br>व.व.२१, धंदा - शेती,<br>रा.सिध्दनेली, ता.कागल, |

| | | |
|---|---|---|
| | | जि.कोल्हापूर.<br>**११३. सुयोग सुनील पाटील,**<br>व.व.२२, धंदा - नोकरी,<br>रा.कदमवाडी रोड, कोल्हापूर.<br>**११४. विशाल बाबासो सरनाईक,**<br>व.व.३४, धंदा - शेती,<br>रा.शिवाजीपेठ, कोल्हापूर.<br>**११५. एकनाथ शंकर गुंजाळ,**<br>व.व.५५, धंदा - नोकरी,<br>रा.पारकोली, ता.आजरा,<br>जि.कोल्हापूर.<br>**११६. सुविधा सुनिल खोत,**<br>व.व.३०, धंदा - नोकरी,<br>रा.मडलगे खुर्द, ता.भुदरगड,<br>जि.कोल्हापूर.<br>**११७. शुभांगी जयसिंग पाटील,**<br>व.व.२१, धंदा - शिक्षण,<br>रा.पंडेवाडी, ता.राधानगरी,<br>जि.कोल्हापूर.<br>**११८. प्रविण परशुराम देसाई,**<br>व.व.२५, धंदा - नोकरी,<br>रा.नादवडे, ता.भुदरगड,<br>जि.कोल्हापूर.<br>**११९. शिवानंद कृष्णा पाटील,**<br>व.व.१८, धंदा - नोकरी,<br>रा.कुर्वी, ता.कागल,<br>जि.कोल्हापूर.<br>**१२०. सुशांत हणमंत अवघडे,**<br>व.व.२७, धंदा - नोकरी,<br>रा.लक्षतीर्थ वसाहत, कोल्हापूर. |

| | | |
|---|---|---|
| | | **१२१. राजवर्धन नामदेव पाटील,**<br>व.व.१८, धंदा - शिक्षण,<br>रा.हासुर खुर्द, ता.कागल,<br>जि.कोल्हापूर.<br>**१२२. जयश्री बाबुराव खोत उर्फ जयश्री विजय पाटील,**<br>व.व.३५, धंदा - घरकाम,<br>रा.मडीलगे, ता.भुदरगड,<br>जि.कोल्हापूर.<br>**१२३. वैशाली विश्वनाथ परब,**<br>व.व.सज्ञान, धंदा - शेती,<br>रा.टीटवे, ता.राधानगरी,<br>जि.कोल्हापूर.<br>**१२४. मंगेश नारकर,**<br>व.व.सज्ञान, धंदा - शेती,<br>रा.राजापूर, ता.शाहुवाडी,<br>जि.कोल्हापूर.<br>**१२५. आदीनाथ संभाजी व्हरकट, (मयत)**<br>व.व.२६, धंदा - शेती,<br>रा.भुयकट गल्ली, शिरगाव, ता.राधानगरी,<br>जि.कोल्हापूर.<br>**१२६. महोदव विष्णू फराकटे,**<br>व.व.३५, धंदा - शेती,<br>रा.दत्तनगर, हेरवडे खालसा ता.करवीर,<br>जि.कोल्हापूर.<br>**१२७. वसंत दिनकर पाटील,**<br>व.व.- सज्ञान, धंदा - शिक्षण,<br>रा.मुदाळ, ता.भुदरगड,<br>जि.कोल्हापूर.<br>**१२८. राजेंद्र मोहन शहा,** |

| | | |
|---|---|---|
| | | व.व. सज्ञान, धंदा - शेती,<br>रा.सातारा.<br>**१२९. संजय बाबुराव खोत, (मयत)**<br>व.व.३५, धंदा - शेती,<br>रा.दत्तनगर, हेरवडे खालसा ता.करवीर,<br>जि.कोल्हापूर.<br>**१३०. दिलेश शिवाजी हुंडेकर,**<br>व.व.-सज्ञान, धंदा - शिक्षण,<br>रा.गंगापुर, ता.भुदरगड,<br>जि.कोल्हापूर.<br>**१३१. दिगंबर हिंदूराव पाटील,**<br>व.व.-सज्ञान, धंदा - नोकरी,<br>रा.सुळबी, ता.राधानगरी,<br>जि.कोल्हापूर.<br>**१३२. अमर शामराव पाटील,**<br>व.व.सज्ञान, धंदा - नोकरी,<br>रा.भादवण, ता.आजरा,<br>जि.कोल्हापूर.<br>**१३३. प्रेरणा प्रमोद सावंत,**<br>व.व.-सज्ञान, धंदा - नोकरी,<br>रा.वडगाव, विजय यादवाडा.<br>**१३४. विश्वास शामराव पाटील,**<br>व.व.-सज्ञान, धंदा - नोकरी,<br>रा.आवळी खुर्द, ता.राधानगरी,<br>जि.कोल्हापूर.<br>**१३५. माया पुंडलिक सावंत,**<br>व.व.३५, धंदा - घरकाम,<br>रा.कबनुर, ता.हातकणंगले,<br>जि.कोल्हापूर.<br>**१३६. हर्षवर्धन उमेश सावंत,**<br>व.व.सज्ञान, धंदा - |

| | | |
|---|---|---|
| | | रा.ई वॉर्ड वाडकर गल्ली, ता.करवीर, जि.कोल्हापूर. |
| आरोपी क्र.०१, ०२, २१ व ५७ तर्फे विधिज्ञ | | श्री.एस.एस.चौगले |
| आरोपी क्र.०६, ०७, ०९, १०, २१, २३, २४, २७, ३०, ३१ ते ३३, ३७, ४१ ते ४५, ४८, ५२, ५३, ६७, ७१, ७४, ७३, ८३ ते ८५, ८७, ९०, ९२, ९९, १०५, १०८, १३० व १३१ तर्फे विधिज्ञ | | श्री.बी.एम.शास्त्री |
| आरोपी क्र.६२ तर्फे विधिज्ञ | | श्री.यु.डी.वाडकर, |
| आरोपी क्र.९३, १२७ तर्फे विधिज्ञ | | श्री.डी.आर.कवाळे, |
| आरोपी क्र.३३, ३४, ३८, ३९, ५५, ३१, ६८, ९८, १०३, १०७, १०९, १११, ११३, ११६, ११७ तर्फे विधिज्ञ | | श्री.डी.जी.पाटील, |
| आरोपी क्र.२८, ५४, ११७ तर्फे विधिज्ञ | | श्री.जे.व्ही.खाडे, |
| आरोपी क्र.१२६ तर्फे विधिज्ञ | | श्री.के.व्ही.पठाडे, |
| आरोपी क्र.४६ व ४७ तर्फे विधिज्ञ | | श्री.व्ही.एस.बन्ने, |
| आरोपी क्र.११ तर्फे विधिज्ञ | | श्री.एम.के.पाटील, |
| आरोपी क्र.१७ तर्फे विधिज्ञ | | श्री.आर.जे. हिलाल, |
| आरोपी क्र.७०, ९१, १५, ८०, १९, २५, २६, ६८, ६९, ८८, ८९, तर्फे विधिज्ञ | | श्री.एस.आर.शिंदे, |
| आरोपी क्र.३ ते ५ तर्फे विधिज्ञ | | श्री.ए.जे.देशपांडे, |
| आरोपी क्र.१३, २९, ३६, ४०, ६४, ६५, ९६, ९७, १०६, १०९ तर्फे विधिज्ञ | | श्री.व्ही.ए.सावंत, |
| आरोपी क्र.१०४ तर्फे विधिज्ञ | | श्री.एस.आर.तांबे, |
| आरोपी क्र.१२३ तर्फे विधिज्ञ | | श्री.पी.पी.साठे-पाटील, |
| आरोपी क्र.१२२ तर्फे विधिज्ञ | | श्री.व्ही.डी.म्हांगोरे, |
| आरोपी क्र.१२१ तर्फे विधिज्ञ | | श्री. एम.के.पाटील, |
| आरोपी क्र.११४ तर्फे विधिज्ञ | | श्री.व्ही.एस.निकम, |
| आरोपी क्र.१३२ तर्फे विधिज्ञ | | श्री.ए.व्ही.हिलगे, |
| आरोपी क्र.५१ तर्फे विधिज्ञ | | श्री.एस.एस.चौगले, |

| | | |
|---|---|---|
| आरोपी क्र.५५ तर्फे विधिज्ञ | | श्री.पी.के.नावले, |
| आरोपी क्र.१४, १८, २०, ७९, ९८ तर्फे विधिज्ञ | | श्री.आर.जी. शेळके, |
| आरोपी क्र.७७, ७८, १००, १०१ तर्फे विधिज्ञ | | श्रीमती पी.व्ही. कांबळे, |
| आरोपी क्र.६६ तर्फे विधिज्ञ | | श्रीमती एच.आर.खंडेलवाल, |
| आरोपी क्र.५८ ते ६० व १३४ तर्फे विधिज्ञ | | श्री.व्ही.ए.पाटील, |
| आरोपी क्र.३८ व ९५ तर्फे विधिज्ञ | | श्री.सी.व्ही.पाटील |

**भाग-ब**

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (ii) अन्वये)

| | | |
|---|---|---|
| अपराध घडल्याचा दिनांक | :- | सन २००९ ते दि.०८/०८/२०१२. |
| गुन्हा नोंद झाल्याचा दिनांक | :- | २२/०८/२०१२. |
| दोषारोप पत्र दाखल केल्याचा दिनांक | :- | २७/०६/२०१३. |
| दोषारोप निश्चित केल्याचे दिनांक | :- | ०५/०५/२०१६, २८/०२/२०२४, ०५/०८/२०२४, ११/११/२०२४, २४/०६/२०१६, २०/०४/२०१७, ०५/१०/२०१७, ०२/११/२०१७, ०६/०७/२०१९. |
| साक्षी पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | :- | २७/०४/२०२६. |
| साक्षी पुरावा बंद केल्याचा दिनांक | :- | १५/०५/२०२६. |
| निकाल देण्यासाठीचा दिनांक | :- | १६/०५/२०२६. |
| निकाल दिनांक | :- | १६/०५/२०२६. |
| शिक्षा दिल्याचा आदेश दिनांक (असेल तर) | :- | निरंक. |
| न्यायनिर्णयातील शिक्षेसंदर्भात आदेशाचा दिनांक | :- | निरंक. |

## आरोपीची माहिती

| आ. क्र. | आरोपीचे नाव | अटक दिनांक | जामिनावर सोडल्याची दिनांक | गुन्हयाचे कलम | अंतिम आदेश | शिक्षा | फौ.प्र.सं.कलम ४२८ अन्वये समायोजित (Set Off) करण्या -बाबत कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | वर नमुद यादीप्रमाणे | -- | - | भा.दं.वि.सं.कलम ४६५, ४६९, ४७१ सह कलम ३४ | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |

## भाग-क

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (iii) अन्वये)

**सरकार पक्षातर्फे देण्यात आलेले साक्षीदार/बचाव पक्षातर्फे साक्षीदार/न्यायालयीन साक्षीदार**

**अ. अभियोग पक्ष**

| सा.क्र. | साक्षीदारांची नावे | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| ०१. | डॉ.चेतन विजय घोरपडे | फिर्यादी | १०५२ |
| ०२. | अशोक अंतु जैन | तपासणी अधिकारी | १०९४ |

**ब. न्यायालयामार्फत निशाणी (फक्त आवश्यक कागदोपत्री पुरावा)**

| अ.क्र. | नि.क्र. | वर्णन |
|---|---|---|
| ०१. | १०९५ | दि.२२/०८/२०१२ रोजीचा संदिप बुरुड व शुभांगी पाटील यांचा श्रवण तपासणी अहवाल जप्ती पंचनामा |
| ०२. | १०९६ | दि.२४/०८/२०१२ आरोपी क्र.१ राहूल परब यांचा निवेदन पंचनामा |
| ०३. | १०९७ | सी.पी.आर. हॉस्पीटल येथील अन्य आरोपींचे कागदपत्र जप्त केलेचा पंचनामा |
| ०४. | १०९८ | आरोपी राहूल परब व अभिजी पाटील यांच्या हाताचे नमुने घेतलेचा पंचनामा |
| ०५. | १०९९ | आरोपी सुहास कांबळे यांचा हाताच्या अंगठयाच्या ठश्यांचे नमुने घेतलेचा पंचनामा |
| ०६. | ११०० | दि.२५/०८/२०१२ रोजी साक्षीदार पुष्पांजली गुरवळ- सोळंखी यांचे कागदपत्र जप्त केलेचा पंचनामा |
| ०७. | ११०१ | दि. ३०/०८/२०१२ रोजी राहूल परब व अभिजीत पाटील यांच्या घराची झडती केलेचा पंचनामा |

| | | |
|---|---|---|
| **०८.** | ११०२ | दि. ३०/०८/२०१२ रोजी साक्षीदार रविंद्र जाधव यांच्याकडून हार्ड डिस्क जप्त केलेचा पंचनामा |
| **०९.** | ११०३ | दि.३१/०८/२०१२ रोजी साक्षीदार सतिश दत्तात्रय जोशी यांची कागदपत्रे जप्त केलेचा पंचनामा |
| **१०.** | ११०४ | दि.०३/०९/२०१२ रोजी राहूल परब व अभिजीत पाटील यांच्या हस्ताक्षराचे नमुने घेतलेचा पंचनामा |
| **११.** | ११०५ | दि.०३/०९/२०१२ रोजी साक्षीदार अभिजीत मुळीक यांचे कागदपत्रे जप्त केलेचा पंचनामा |
| **१२.** | ११०६ | दि.०३/०९/२०१२ रोजी आरोपी क्र.१ व २ यांच्या हस्ताक्षरातील असलेले कागदपत्रे वेगळे केलेचा पंचनामा |
| **१३.** | ११०७ | दि.०८/०९/२०१२ रोजी डॉ संदिप बागडी यांच्याकडून मुळ हस्ताक्षराचे नमुने प्राप्त केलेचा पंचनामा |
| **१४.** | ११०८ | दि.१२/०९/२०१२ रोजी फिर्यादीने हजर केलेले बिल बुक जप्त केलेचा पंचनामा |
| **१५.** | ११०९ | दि.१९/०९/२०१२ रोजी आंगडी यांनी ५२ लोकांचे केसपेपर व कागदपत्र हजर केली ती जप्त केलेचा पंचनामा |
| **१६.** | १११० | दि.२३/०९/२०१२ रोजी अपंगत्व कागदपत्र आरोपी व अन्य इसमांनी ३४ कागदपत्रे हजर केलेचा पंचनामा |
| **१७.** | ११११ | दि.०७/०५/२०१३ रोजी लाभार्थी व अन्य ०१ ते ७५ इसमांनी कागदपत्र हजर केलेचा पंचनामा |
| **१८.** | १११२ | दि.१४/०५/२०१३ रोजी लाभार्थी व अन्य अ.क्र.१ ते ७ इसमांनी कागदपत्र हजर केलेचा पंचनामा |
| **१९.** | १११३ | दि. २४/०९/२०१२ रोजी पुष्पांजली गुरवळ यांनी त्यांच्या हस्ताक्षरांचे व सह्यांचे नमुने घेतलेचा पंचनामा |
| **२०.** | १११४ | दि.२५/०९/२०१२ रोजी संदेश बागडी व अभिजीत मुळीक यांच्या हस्ताक्षरांचे नमुने घेतलेचा पंचनामा |
| **२१.** | १११५ | दि.११/०८/२०१३ वेगवेगळ्या लोकांचे हस्ताक्षरांचे व सह्यांचे नमुने मा.पोलीस अधिक्षक कार्यालय, कोल्हापूर यांचेकडे पाठविलेचे पत्र |
| **२२.** | १११६ | मा.पोलीस अधिक्षक यांनी पाठविलेले कागदपत्र पुढील तपासणी-करिता हस्ताक्षर तज्ञ, पुणे येथे पाठविलेचे पत्र |
| **२३.** | १११७ | दि.०५/१०/२०१२ रोजी वेगवेगळ्या आरोपींचे अंगुली मुद्रांचे नमुने पुढील तपासणीकरिता संचालक अंगुली मुद्रा केंद्र पुणे येथे |

| | | |
|---|---|---|
| | | पाठविलेचे पत्र |
| **२४.** | १११८ | दि.१९/१२/२०१२ रोजी गुह्यातील हार्ड डिस्क वैज्ञानिक प्रयोग शाळा, मुंबई येथे पुढील तपासणीकरिता पाठविलेचे पत्र |
| **२५.** | १११९ | दि.०९/०९/२०१२ रोजी अधिष्ठाता शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, कोल्हापूर यांना आरोपी क्र.१ व २ यांची माहिती मिळणेकरिता पाठविलेले पत्र |
| **२६.** | ११२० | दि.२६/०९/२०१२ रोजी सी.पी.आर.हॉस्पीटल यांच्याकडून गुन्ह्याच्या अनुषंगाने माहिती. |
| **२७.** | ११२१ | दि.०१/०६/२०१३ रोजी डॉ.संदेश बागडे यांच्या नेमणुकीचा आदेश |
| **२८.** | ११२२ | दि.१८/०९/२०१२ रोजी सी.पी.आर.कडून १८३/२०१२ चे छाननी अहवाल |
| **२९.** | ११२३ | दि.१२/०९/२०१२ रोजी प्राप्त झालेला २९ आरोपींचा तपासणी अहवाल |

# न्या य नि र्ण य

**( पारित दि.१६ मे, २०२६ रोजी.)**

आरोपी क्र.०१ ते ४८, ५० ते ५५, ५७ ते ११२, ११४ ते ११९, १२१ ते १२४, १२६, १२७, १३० ते १३२, १३४ ते १३६ विरुध्द भा.दं.वि.सं.कलम ४६५, ४६९, ४७१ सह कलम ३४ अन्वये अपराध ठेवून प्रस्तुतचा खटला चालविण्यात आला. आरोपी क्र.४९, १२५ व १२९ हे मयत असल्याने सदरचे प्रकरण त्यांच्याविरुध्द अवसान पावले आहे. तसेच आरोपी क्र.५६, ११३, १२०, १२८, १३३ हे मिळून येत नसल्याने त्यांची सुनावणी वेगळी करण्यात आली आहे. तसे दोन्ही आदेश नि.क्र.०१ लगत पारीत करण्यात आले आहेत.

**अभियोग पक्षाचे थोडक्यात कथन असे की -**

**०२.** सन २००९ पासुन ते दि.०८/०८/२०१२ रोजी या कालावधीमध्ये राजश्री छत्रपती शाहू महाराज शासकिय वैद्यकिय महाविद्यालय आणि प्रमिला राजे जनरल हॉस्पीटल कोल्हापुर मधील आवारात तसेच कान, नाक, घसा विभागात आरोपी क्र.१

व २ हे हंगामी, कंत्राटी लिपीक या पदावरील कर्मचारी होते. त्यापैकी काही आरोपी हे एजंट म्हणुन काम करणारे असुन आरोपी क्र.५० हे संबधीत विभागाचे तत्कालीन कान, नाक, घसा या विभाग प्रमुख या पदावर काम करणारे शासकिय वैद्यकिय अधिकारी होते. तसेच आरोपी क्र.८ हा इतर आरोपी यांचेशी संगनमत करुन बनावट व हुबेहुब श्रवण रिपोर्ट फोनेक, वाचा श्रवन केंद्र कोल्हापुर यांचे श्रवण रिपोर्ट सारखा दिसणारा खोटा बनावट संगणकाव्दारे फॉर्मेट तयार करुन त्याची प्रिंट फॉर्म बनवुन देणारा असून व आरोपीत आरोपी क्र.६, ७ व १ ते ४९ व ५१ ते १३६ हे कोल्हापुर जिल्ह्यातील विविध ग्रामीण, शहर, उपनगर परिसरात राहून वरील सर्व आरोपीशी संगनमताने कर्ण बधीर नसतानाही व काही अंशी बधीर असताना ते पुर्णपणे कर्णबधीर आहेत असे शासनास भासवुन त्यातुन शासकिय लाभ प्राप्त करुन घेणेच्या प्रयोजनार्थ बनावट श्रवण रिपोर्ट आरोपी क्र.१ व २ यांचे हस्ताक्षरात तयार करुन घेवुन ते मुळ प्रकरणी सामिल करुन घेतले व त्या आधारे ते कर्ण बधीर अंपगत्व आहेत असा वैद्यकिय प्रमाणपत्र प्राप्त करुन घेणारे लाभार्थी आहेत. त्यापैकी काहींनी एस.टी. प्रवास सवलत, लोकसेवा आयोगा मार्फत घेतलेल्या स्पर्धा परिक्षेतील नमुद अंपगत्वासाठीच असलेले राखीव तिन टक्के जागेपैकी सरकारी निमसरकारी सेवा प्राप्त करुन घेवुन ते स्वतः पुर्णपणे बहिरे नसल्याचे त्याना सर्वानाच माहिती असताना केवळ शासकिय सवलती प्राप्त करुन घेता येतात व त्याचा भविष्यात केव्हाना केव्हातरी आपलेला उपयोग होईल या हेतुस्तव श्रवण रिपोर्ट बनावट व खोटे असल्याचे त्या सर्वांना पुर्णपणे एकमेकाकरवी माहिती असताना ते खरे असल्याचे भासवुन व विविध अटक अरोपीत यांचे वैद्यकीय तपासणीचे मुळ कागदपत्रात हेतुपुरस्कारपणे, लबाडीने व एकमेकांनी आपले अर्थिक लाभ मिळविता यावा या करीता वरील दोन हंगामी कर्मचारी व एजन्ट व लाभार्थी इ. यानी नमुद कृत्य हे बेकायदेशीर चुकीची खोटी असल्याचे माहिती असतानाही जाणीवपुर्वक खोटे कागदपत्र तयार करुन लाभार्थी हे कर्ण बधीर नसताना किंवा ते कमी प्रमाणात ऐकणेची क्षमता असताना त्याना ४५ व त्यापेक्षाही अधिक

प्रमाणात टक्केवारीची फेरफार करुन विषेशतः आरोपी क्र.५० नमुद विभाग प्रमुख या महत्वाचे पदावर शासकिय सेवेतील कार्य कालावधीत त्याबाबतचे नोंदिमधील फेरफार व तफावती तयार करुन लाभार्थीचा लाभ व्हावा व अर्थिक लाभ व्हावा याकरीता त्यानी बनावट कागदपत्र तयार करुन सी.पी.आर. हॉस्पीटलचे व लोकहिताचे नुकसान पोहचविणेकरीता यातील लोकसेवक यानी चुकीचे खोटे, बनावट वस्त श्रवण रिपोर्ट लाभार्थी आरोपीकडुन ५ ते १० हजार रुपये पर्यंत रक्कम घेवून अर्थिक लाभ घेवुन बनावट दस्त तयार करुन ते मुळ प्रकरणात सामिल करुन त्याऐवजी मुळ फोनेक श्रवण वाचा केंद्र व रोटरी वाचा श्रवण केंद्र कोल्हापुर यांचे कडुन लाभार्थी रुग्णाकडून ते आरोपीत लोकसेवकापर्यंत, एजंन्टापर्यंत पोहचलेले. आरोपींनी पुर्व नियोजीत कट त्यांचे शासकिय कार्यालयातच करुन वरील अटक अरोपी हे लाभार्थी अपंगत्व प्रमाणपत्र मिळविणेकरीता प्राप्त असो किंवा नसो त्याना बनावट श्रवण रिपोर्टचे आधारे ते कर्णबधीर असलेबाबतचे बनावट अंपगत्वाचे प्रमाणपत्र आदा करुन देवुन व लाभार्थी आरोपींनी विविध प्रकारचे लाभ घेऊन शासनाची फसवणुक केलेली आहे. म्हणुन लक्ष्मीपुरी पो.ठा. येथे फिर्याद दिली. त्यानंतर प्रथम खबर अहवाल नोंदविला. प्रथम खबर अहवाल नोंदविल्यानंतर गु.र.क्र.१०७/२०१२ दाखल करण्यात आला. त्याचा तपास तपासणी अधिकारी पो.उ.नि.श्री.अशोक अंतु जैन यांच्याकडे सुपुर्त करण्यात आला. त्यांनी गुन्हयाची सखोल चौकशी केली, साक्षीदारांचे जबाब नोंदविले, पंचनामा केला व तपासकाम पूर्ण करून तपासाअंती आरोपीविरुध्द उपरोक्त कलमान्वये न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

**०३.** आरोपी न्यायालयात हजर राहिल्यानंतर त्यांच्यावर भा.दं.वि.सं.कलम ४६५, ४६९, ४७१ सह कलम ३४ अन्वये दोषारोप निश्चित करण्यात आले. आरोपींना गुन्हा कबूल नसलेने व त्यांनी संपरिक्षेस सामोरे जाणेस तयार असल्याचे सांगितल्याने आरोपींविरुध्द संपरीक्षा चालविण्यात आली. त्यानंतर साक्षीदारांचे जबाब नोंदवण्यात

आले. नि.क्र.११३० कडे पुरसिस देऊन सरकार पक्षाने पुरावा बंद केला. आरोपींविरुध्द कोणताही सबळ पुरावा अभिलेखावर न आल्याने आरोपींचे भा.ना.सु.सं.कलम ३५१ प्रमाणे निवेदन निरस्त करण्यात आले. तसा आदेश नि.क्र.०१ लगत पारीत करण्यात आला आहे.

**०४.** अभियोगपक्षातर्फे सरकारी अभियोक्ता व बचावपक्षाचे विधिज्ञ यांचा युक्तिवाद ऐकला. खालील मुद्दे माझ्या विचाराधीन असून कारणमिमांसासह मी त्यावर माझे निष्कर्ष देत आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| **०१.** | अभियोगपक्ष हे सिध्द करतो का की, सन २००९ पासुन ते दि.०८/०८/२०१२ या कालावधीमध्ये राजश्री छत्रपती शाहू महाराज शासकिय वैद्यकिय महाविद्यालय आणि प्रमिला राजे जनरल हॉस्पीटल कोल्हापुरमधील आवारात, कान, नाक व घसा विभागात आरोपींनी त्यांच्या समान उद्देशाच्या पुर्नःसारणार्थ स्वत:च्या फायद्याकरिता बोगस बहिरेपणाच्या अपंगत्वाचे प्रमाणपत्र तयार करुन बनावटीकरण केले ? | **नाही.** |
| **०२.** | अभियोगपक्ष हे सिध्द करतो काय की, वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने आरोपींनी त्यांच्या समान उद्देशाच्या पुर्नःसारणार्थ स्वत:च्या फायद्याकरिता बोगस बहिरेपणाचे अपंगत्वाचे प्रमाणपत्र तयार करुन ते खोटे आहे हे माहिती असताना देखील ते फसवणुक करण्याच्या उद्देशाने व सी.पी.आर. हॉस्पीटलच्या व लोकहिताच्या प्रतिष्ठेला हानी पोहचवली ? | **नाही.** |
| **०३.** | अभियोगपक्ष हे सिध्द करतो काय की, वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी त्यांच्या समान उद्देशाच्या पुर्नःसारणार्थ | **नाही.** |

| | | |
|---|---|---|
| | स्वत:च्या फायद्याकरिता बोगस बहिरेपणाच्या अपंगत्वाचे प्रमाणपत्राचे बनावटीकरण केले व ते खोटे आहे हे माहिती असताना देखील ते फसवणुक करण्याच्या उद्देशाने व अप्रामाणिकपणे खरा म्हणुन वापरले ? | |
| **०४.** | आदेश काय? | **अंतिम आदेशाप्रमाणे.** |

## का र ण मि मां सा

**मुद्दा क्र.०१ ते ०३ करीता :-**

**०५.** मुद्दा क्र.०१ ते ०२ हे एकमेकांशी संलग्न असल्यामुळे पुराव्याची पुनरावृत्ती टाळण्याकरीता प्रस्तुतचे मुद्दे हे एकत्रीतरित्या विचारात घेण्यात येत आहे. आरोपीविरुध्द असलेले दोषारोप सिध्द करण्यासाठी अभियोगपक्षाने एकूण दोन साक्षीदाराची साक्ष नोंदविली आहे.

साक्षीदार क्र.०१ चेतन विजय घोरपडे (फिर्यादी) यांच्या साक्षीत असे आले की, सहयोगी प्राध्यापक कान, नाक व घसा म्हणुन काम करत असताना स.०९.०० ते ०१.०० बाहय रुग्न विभाग, कान, नाक व घसा व एक दिवस शस्त्रक्रिया असा होता तसेच दु.०२.०० ते ०५.०० प्रशासकीय व शैक्षणिक काम असे होते. दि.०८/०८/२०१२ रोजी बाहय रुग्ण विभाग येथे संदीप बुरुड नावाची व्यक्ती आली होती. त्यांच्याकडे फोनेक वाचा श्रवण विकार केंद्र यांचा अहवाल होता. अहवालानुसार बहिरेपणाचा अपंगत्वाचा दाखला मिळण्याकरीता ते त्यांच्याकडे आले असता त्यांनी अहवालाची पाहणी केली समोरच्या पानावर मेडीकल भाषेत आलेख होता परंतु त्यांच्या मागील पानावर शेरा व सही आवश्यक असते ती नव्हती. दि.१९/०७/२०१२ रोजीचा अहवाल घेऊन अहवाल देणा-या पुष्पांजली गुरवळ-सोळंखी यांच्याशी सपर्क केला. त्यानंतर त्यांनी त्यांना त्यांच्याकडील अभिलेखाची पाहणी करुन सदर नावाची व्यक्ती दि.१७/०७/२०१२ रोजी येऊन गेली असे सांगितले व त्यांनी अहवालावर सही

व शेरा करुन दिल्याचे खात्रीलायक सांगितले. त्यानंतर रुग्णाला आत बोलावून सदरचा अहवाल कोठून मिळवला असे विचारले असता त्यांनी सावंत साहेब यांनी पुर्वी तपासणी करुन अहवाल दिला आहे असे सांगितले. वरिष्ठ अधिष्ठाता डॉ.रघुजी थोरात यांना सदर अहवालाबाबत कळवले असता त्यांनी पुष्पाजंली मॅडम यांना अहवालाची पुन्हा एकदा खात्री करण्यास सांगितले. त्यावेळी पुष्पाजंली मॅडम यांनी सदरचा अहवाल त्यांच्या केंद्रामध्ये बनवला नसल्याचे सांगितले. सदर घटनेनंतर त्यांचे विभाग प्रमुख तसेच वरिष्ठ अधिष्ठाता श्री.थोरात यांनी जुन २०११ ते ऑगस्ट २०१२ या कालावधीमधील जुने रेकॉर्ड तपासले असता एकूण ११० हुन अधिक शंकास्पद अहवाल मिळून आले. घटनेदिवशी आणखी एक व्यक्ती शुभांगी जयसिंग पाटील व त्यांचे पती शुभांगी पाटील यांचा बहिरेपणाच्या अपंगत्वाच्या दाखला मिळवण्याकरीता आल्या होत्या. त्यांनी देखील फोनेक वाचा श्रवण विकार केंद्र यांच्याकडील अहवाल दाखवला. सदरचा अहवाल हा शंकास्पद वाटल्यामुळे त्यांनी पुन्हा एकदा पुष्पांजली मॅडम यांना फोन करुन खात्री केली असता सदरचा अहवाल दिलेली तारीख त्यांच्याकडे पेशंटने तपासणी केलेली तारीख यामध्ये तफावत आढळून आली. पुर्वी सन २०१० पर्यंत याची तपासणी सी.पी.आर.येथे ऑडीओलॉजिस्ट उपलब्ध असल्याने होत होती. त्यानंतर त्याला श्रवण आलेख तपासणी करीता फोनेक वाचा श्रवण विकार केंद्र किंवा रोटरी वाचा श्रवण विकार केंद्र येथे पाठविले जाते. त्यानंतर तपासणी करुन अहवालावर शेरा व सही घेऊन रुग्ण पुन्हा सी.पी.आर. येथे पुढील तपासणीकरीता येतो. श्रवण आलेख व तपासणी अहवाल याची सांगड घालुन रुग्णाला अपंगत्वाचा दाखला दिला जातो. अपंगत्वाच्या दाखल्यावर कान, नाक, घसा तज्ञांची, वैद्यकीय अधिक्षक, उपअधिक्षक अशा तिघांच्या सहया असतात. दाखल्यावर तज्ञांची सही कागदाच्या डाव्या बाजुला तसेच फोटोवर अशा दोन ठिकाणी असतात. सदरची घटना घडल्यानंतर वरिष्ठांच्या आदेशाने त्यांनी लक्ष्मीपुरी पोलीस ठाणे येथे फिर्याद (नि.क्र. १०५३) दिली. घटनेला बरीच वर्ष झाल्यामुळे तसेच रोज बरेच पेशंट तपासले

जात असल्यामुळे संदिप बुरुड व शुभांगी पाटील यांना पाहिल्यास ते ओळखू शकत नाहीत. पोलीसांनी त्यांचा जबाब नोंदविला होता. काही तांत्रिक कामांसाठी पोलीसांनी त्यांना पोलीस ठाण्यात बोलाविले होते.

**०६.** सदर साक्षीदाराचा उलटतपास घेतला असता त्यांनी त्यांच्या उलटतपासामध्ये मान्य केले आहे की, श्रवण आलेख केंद्र हे सी.पी.आर.मध्ये मार्च, २०१० कार्यरत होते. त्यावेळी पुष्पांजली मॅडम व अजुन एक पुरुष डॉक्टर ते काम पाहत होते. फोनेक वाचा श्रवण विकार केंद्र या व्यतिरिक्त कोल्हापूर येथे तीन वाचा श्रवण विकार केंद्र होते. श्रवण अहवाल हे जास्तीत जास्त पुष्पांजली मॅडम यांच्या केंद्राचे होते. फोनेक वाचा श्रवण विकार केंद्र येथे रुग्ण सी.पी.आर. मधुन पाठवले जायचे. फोनेक वाचा श्रवण विकार केंद्र येथे जाण्यापुर्वी सी.पी.आर.हॉस्पीटल येथे केस पेपर काढावा लागत असे. केस पेपरचे रजिस्टर सी. पी.आर.हॉस्पीटल येथे असते. अहवाल आल्यानंतर सी.पी.आर.चे रजिस्ट्रार राजश्री बकरे मॅडम यांच्याकडे प्रमाणपत्रासाठी लागणा-या कागदपत्रांची पुर्तता करावी लागत असे. रजिस्ट्रार यांच्या नोंदीचे वेगळे रजिस्टर असायचे. त्यांच्या विभागामध्ये चार तपासणीचे टेबल होते. त्यांच्या विभागामध्ये वैद्यकीय अधिकारी, सहा.प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक व प्राध्यापक असतात. ज्यांना प्रमाणपत्र दिले आहे अशा व्यक्तीचा केस पेपर सी.पी.आर.येथे जमा असतो. संदीप बुरुड व शुभांगी पाटील यांचे केस पेपर मिळाले होते. ज्या व्यक्तिंना प्रमाणपत्र दिले गेले अशांचे केसपेपर त्यांनी व्यक्तीशः पाहिलेले नाही. फिर्याद दिल्यानंतर पोलीसांनी सी.पी.आर. येथे रेकॉर्ड जप्त केले. प्रमाणपत्र देण्याचे काम ते, डॉ.थोरात सर, डॉ.संदेश बागडी व डॉ.अजित लोकरे असे करत होते. मिळालेल्या रेकॉर्डमध्ये तपासणीचे अहवाल त्यांच्या तसेच डॉ.थोरात सर, डॉ.संदेश बागडी व डॉ.अजित लोकरे यांच्या हस्ताक्षरातील सहीचे आहेत. त्यांनी तपासणी केल्यानंतर तसेच श्रवण आलेख प्राप्त झाल्यानंतर प्रमाणपत्र दिले. प्रमाणपत्र

देण्याचे कामकाज रजिस्ट्रार बकरे मॅडम करतात. प्रमाणपत्रावर सिव्हील सर्जनच्या सहीची आवश्यकता नसते. सदरची फिर्याद ही संशयावरुन दाखल केलेली आहे.

**०७.** साक्षीदाराने पुढे असे देखील मान्य केले आहे की, दि.१८/११/२०१० रोजी बहिरेपणाच्या अपंगत्वाचा दाखला कसा द्यावा याबाबत सरकारकडून नियमावली जाहीर झाली होती व ती त्यांना मिळाली आहे. महाराष्ट्रातील अपंगात्वाच्या कायद्यांचा परामर्ष घेऊन प्रस्तुतची नियमावली सरकाडुन जाहीर करण्यात आली. नियमावलीनुसार तीन तज्ञांची कमिटी हॉस्पीटलने नेमायची असते. त्या कमिटीने रुग्णाची तपासणी करायची आहे. त्यानंतर रुग्णास अपंगत्वाचे प्रमाणपत्र देत असताना त्याचा फोटो, आधार कार्ड घेऊन रितसर रजिस्टरला नोंदवुन द्यायचे असते. दिलेल्या प्रमाणपत्रांचे रजिस्टर पोलीसांकडे हजर केलेले आहे. सदरचे रजिस्टर विभाग प्रमुख यांच्या उपस्थितमध्ये रजिस्ट्रार यांनी पोलीसांच्या ताब्यात दिले आहे. प्रमाणपत्र त्यांच्या सहीने दिलेले आहे. तीन सदस्यांच्या कमिटीमध्ये ते एक सदस्य आहेत. फोनेक वाचा श्रवण विकार केंद्र यांच्याकडील अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्याची शहानिशा करण्याकरीता सी.पी.आर. येथे यंत्रणा उपलब्ध नाही. फोनेक वाचा श्रवण विकार केंद्र यांच्याकडुन प्राप्त झालेल्या अहवालावर विश्वास ठेवुन ते प्रमाणपत्र देतात. तीन सदस्यांपैकी दुसरा एक सदस्य कान, नाक, घसा तज्ञ आहे. फोनेक वाचा श्रवण विकार केंद्राच्या गुरवळ मॅडम या त्यांच्या पुर्वी सहकारी असल्यामुळे ते त्यांना ओळखतात. त्यांचे हस्ताक्षर व सही ते ओळखत होते. त्यामुळे प्रमाणपत्रावरील सहया व हस्ताक्षर ते ओळखत होते. त्यामुळे प्रमाणपत्रावर काहीही अवैध्य नाही असे त्यांना वाटत होते. आरोपींना दिलेले प्रमाणपत्र खरे आहेत. सदरचे प्रमाणपत्र हे दि.०१/०६/२०११ ते ०८/०८/२०१२ या कालावधीमध्ये दिलेले प्रमाणपत्र आहेत. सरकारी नियमावली सन २०१० मध्ये जाहीर झाली व त्यानुसार प्रमाणपत्र दिले. दि.०१/०६/२०११ पुर्वीचे तसेच दि.०८/०८/२०१२ रोजीनंतरचे कोणतेही रेकॉर्ड

नाहीत. फिर्यादीमध्ये नमुद प्रमाणपत्र क्र.०१ ते ७९ त्यांच्या सहीने दिलेले आहेत. पर्यायाने त्यांच्याकडे कामाचा कार्यभार असल्यामुळे त्यांनी फिर्याद दिली आहे. त्यांच्याप्रमाणेच इतर सदस्यांना देखील घटनेची माहिती आहे. प्रमाणपत्र जप्त करण्यापुर्वी पोलीसांनी त्यांना प्रमाणपत्र खरे किंवा खोटी आहेत याबाबतची खात्री करण्याकरिता सांगितले नव्हते. जप्त प्रमाणपत्र त्यांना दाखवले होते. पोलीसांना प्रमाणपत्र खरे आहेत हे माहित होते. अनेक रुग्णांचे शस्त्रक्रिया झाल्याचे कागदपत्र पोलीसांनी जप्त केले. त्या शस्त्रक्रियेनंतर श्रवण आलेख घेतला त्यानुसार टक्केवारीमध्ये प्रमाणपत्र दिले. श्रवण आलेख नसेल तर व्यक्तीला पाहुन त्यांच्यामध्ये बहिरत्व आहे हे सांगू शकत नाही. बहिरेपणा हा नैसर्गिक आपत्तीमुळे, अपघातामुळे आणि अनुवांशिकपणे येऊ शकतो. श्रवण आलेखामध्ये बहिरेपणा नेमका कोणत्या कारणामुळे आला हे सांगता येत नाही. रुग्ण तपासणीकरीता आल्यानंतर त्याचा इतिहास विचारला जातो त्याची नोंद देखील केसपेपरमध्ये केली जाते. एखाद्या व्यक्तीची बाहेरच्या रुग्णालयात शस्त्रक्रिया झाल्यास खाजगी डॉक्टरांना तसा अहवाल देता येत नाही. बहिरत्व आलेल्या प्रत्येक व्यक्तीला बाहेर उपचार घेऊन देखील प्रमाणपत्र घेण्याकरीता सी.पी.आर. येथेच यावे लागते. प्रमाणपत्र देत असताना देखील रुग्णांचा पुर्व इतिहास विचारला जातो. अशा अनेक व्यक्तीना त्यांनी तपासुन प्रमाणपत्र दिलेले आहेत. श्रवण आलेख खोटा दिल्यामुळे त्यांना प्रमाणपत्र द्यावे लागले. श्रवण आलेख दिल्यानंतर त्यांनी पुन्हा एकदा तपासणी न करता प्रमाणपत्र दिले. श्रवण आलेख अहवाल हा फोनेक वाचा श्रवण विकार केंद्र यांच्याकडून येत होते. प्रस्तुत केंद्रांच्या संचालिका गुरवळ मॅडम होत्या. गुरवळ मॅडम या सी.पी.आर. हॉस्पीटल येथे काम करत होत्या. प्रमाणपत्र देण्याचा अधिकार केवळ तज्ञांना असतो.

**०८.** साक्षीदाराने पुढे असे देखील मान्य केले आहे की, डिसॲबिलीटी टेस्टमध्ये त्रुटी असु शकतात. तज्ञांनी केलेल्या डिसॲबिलीटी टेस्टमध्ये तफावत येऊ शकते.

डिसॲबिलीटी ही रुग्णाला आवाज किती ऐकू जातो यावरुन ठरवली जाते. जर त्या मशिनमधुन आवाज कमी गेला तर ती टेस्ट चुकू शकते. श्रवण आलेख चुकल्यास रुग्णाच्या डिसॲबिलीटीच्या टक्केवारीवर परिणाम होऊ शकतो. दि.०८/०८/२०१२ रोजी घटना घडली. दि.२२/०८/२०१२ रोजी फिर्याद दाखल करण्याकरीता त्यांना तोंडी आदेश दिले. प्रस्तुतची फिर्याद त्यांनी शासकीय कामकाजाचा भाग व वरिष्ठांचा आदेश म्हणुन दिली.

**०९.** साक्षीदार क्र.०२ अशोक अंतु जैन (तपासणी अधिकारी) ऑगस्ट, २०१२ मध्ये ते लक्ष्मीपुरी पोलीस ठाणे येथे पोलीस उपनिरिक्षक म्हणुन कार्यरत होते. गु.र.क्र.१०७/२०१२ चा तपास त्यांच्याकडे तोंडी आदेशाने आला. त्यांनी सदर कामी स्वत: फिर्याद (नि.क्र.१०७०) दाखल केली आहे. त्यावर त्यांची दाखल करणार म्हणुन सही व शेरा आहे. दि.२२/०८/२०१२ रोजीच्या पंचनाम्यावर (नि.क्र.१०९५) त्यांची तसेच दोन पंचाची सही आहे. राहुल परब व अभिजीत पाटील यांच्या हाताचे नमुने घेतले व त्याबाबतचा पंचनामा (नि.क्र.१०९८) केला. आरोपी सुहास कांबळे यांच्या हाताच्या अंगठयाच्या ठश्यांचे नमुने घेतले व त्याबाबतचा पंचनामा (नि.क्र. १०९९) केला. दि.२५/०८/२०१२ रोजी साक्षीदार पुष्पांजली गुरवळ-सोळंखी यांनी हजर केलेली कागदपत्र जप्त केली व त्याबाबतचा पंचनामा (नि.क्र.११००) केला. दि.३०/०८/२०१२ रोजी साक्षीदार रविंद्र जाधव यांच्याकडुन हार्ड डिस्क जप्त केली त्याबाबतचा जप्ती पंचनामा (नि.क्र.११०२) केला. दि.०८/०९/२०१२ रोजी डॉ. संदिप बागडी यांच्याकडुन मुळ हस्ताक्षराची नमुने प्राप्त करुन घेतले व त्याबाबतचा पंचनामा (नि.क्र.११०७) केला. दि.१२/०९/२०१२ रोजी फिर्यादीने हजर केलेली बिल बुक जप्त केली व त्याबाबतचा पंचनामा (नि.क्र.११०८) केला. दि.२४/०९/१२ रोजी पुष्पाजंली गुरवळ यांनी त्यांच्या हस्ताक्षरांचे व सहयांचे नमुने घेतले व त्याबाबतचा पंचनामा (नि.क्र.१११३) केला. दि.२५/०९/२०१२ रोजी संदेश बागडी

व अभिजित मुळीक यांच्या हस्ताक्षरांचे नमुने घेतले त्याबाबतचा पंचनामा (नि.क्र. १११४) केला. साक्षीदारांचे तपास टिप्पण नोंदविले. दि.११/०८/२०१३ रोजी वेगवेगळया लोकांचे वेगवेगळया हस्ताक्षरातील वेगवेगळे सहयांचे नमुने मा.पोलीस अधिक्षक कार्यालय, कोल्हापूर यांच्याकडे (नि.क्र.१११५) पाठविले. मा.पोलीस अधिक्षक यांनी पाठविलेले कागदपत्र (नि.क्र.१११६) पुढील तपासणीकरीता हस्ताक्षर तज्ञ, पुणे येथे पाठविले. दि.०५/१०/२०१२ रोजी वेगवेगळया आरोपींचे अंगुली मुद्रांचे नमुने (नि.क्र.१११७) पुढील तपासणीकरीता संचालक अंगुली मुद्रा केंद्र, पुणे येथे पाठविले. दि.१९/१२/२०१२ रोजी गुन्हयातील हार्ड डिस्क वैज्ञानिक प्रयोग शाळा, मुंबई येथे पुढील तपासणीकरीता पाठविले. दि.१८/०९/२०१२ रोजी सी.पी.आर. कडुन १८३/२०१२ चे छाननी अहवाल (नि.क्र.११२२) प्राप्त झाला. दि.१२/०९/१२ रोजी २९ आरोपींचा तपासणी अहवाल (नि.क्र.११२३) प्राप्त झाला. या कामातील आरोपींची अपंगत्वाबाबतची तपासणी करुन त्यांचे अहवाल प्राप्त झाले. काही आरोपींची तपासणी मुंबई येथे करण्यात आली. त्यापैकी एक आरोपी अपंगत्वाचा दाखला मिळण्यास पात्र बाकीचे आरोपी अपात्र असा अहवाल प्राप्त झाला. ते या कामी हजर केले. तपासाअंती आरोपीविरुध्द दोषारोप दाखल करण्यात आले आहे.

**१०.** सदर साक्षीदाराचा उलटतपास घेतला असता त्यांनी त्यांच्या उलटतपासामध्ये मान्य केले आहे की, प्रस्तुतचा गुन्हा दाखल झाला त्या दिवशी ते ठाणे अंमलदार म्हणुन होते. त्यांनी ठाणे अंमलदार म्हणुन फिर्यादीची फिर्याद नोंदविली. त्यांनी प्रस्तुत फिर्यादीची माहिती पी. आय.यांना दिली. फिर्याद नोंदवताना डॉ.चेतन घोरपडे आले होते त्यांच्याशी त्यांचा विचारविनिमय झाला. फिर्यादी यांनी सोबत आणलेले कागदपत्र त्यांनी पाहिले होते. प्रत्येक आरोपीचे प्रकरण वेगवेगळे होते. आरोपीने दाखल केलेले कागदपत्र न्यायालयात हजर आहेत. लाभार्थी जेव्हा सी.पी.आर.येथे जातो तेव्हा त्याला केसपेपर काढावा लागतो. केस पेपर काढल्यानंतर

त्याची तपासणी केली जाते. ज्या कालावधीमध्ये श्रवण आलेख अहवाल काढण्याची सी.पी.आर.येथे सुविधा नव्हती त्या कालावधीमध्ये बाहेरुन विविध हॉस्पीटलमधुन सदरचा अहवाल काढुन आणावा लागत असे. सी.पी.आर.हॉस्पीटलमध्ये सेवा बजावुन बाहेर पडलेल्या डॉक्टरांकडुन सदरचा अहवाल आणत असे. श्रवण आलेख अहवालाची तपासणी करुन त्यानंतर त्याबाबचे प्रमाणपत्र देण्यात आले. दि.१८/११/१० रोजी बहिरेपणाच्या अपंगत्वाचा दाखला कसा द्यावा याबाबत सरकारकडून नियमावली जाहीर झाली होती व ती त्यांनी पाहिली आहे. नियमावलीनुसार तीन तज्ञांची कमिटी हॉस्पीटलने नेमायची आहे. त्यांच्याकडे आलेल्या प्रमाणपत्रामध्ये तीन डॉक्टरांच्या सहया आहेत. त्या तीनमधील एक सही फिर्यादी डॉ.चेतन घोरपडे यांची आहे. जप्त केलेल्या कागदपत्रांच्या पडताळणीसाठी बेरा तपासणी करण्यात आली. सदरचा व्यक्ती हा पात्र आहे किंवा नाही याबाबतचा खुलासा अथवा त्यांचे जबाब नोंदविले नाहीत. त्यांनी सर्व लाभार्थ्यांना बोलावून त्यांच्याकडून प्रमाणपत्र जप्त केलेले आहेत.

**११.** न्यायालयीन पटलावर आलेल्या पुराव्याच्या आधारे आरोपीविरुध्द कोणताही गुन्हा सिध्द होत नाही. तसेच सदर साक्षीदारांची साक्ष अभियोग पक्षाला पुरक ठरत नाही. अभियोगपक्ष आरोपीविरुध्द दोषारोप सिध्द करण्यास असमर्थ ठरला आहे. सदर कामी कोणताही स्वतंत्र पंच साक्षीदार तपासलेला नाही. अभियोग पक्षास पुरेशी संधी देऊन देखील इतर कोणतेही साक्षीदार तपासलेले नाहीत. फिर्यादीने केवळ संशयावरुन फिर्याद दिल्याचे मान्य केले आहे. फोनेक वाचा श्रवण विकार केंद्र यांच्याकडील अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्याची शहानिशा करण्याकरीता सी.पी.आर. येथे यंत्रणा उपलब्ध नाही. फोनेक वाचा श्रवण विकार केंद्राच्या गुरवळ मॅडम या त्यांच्या पुर्वी सहकारी असल्यामुळे ते त्यांना ओळखतात, त्यांचे हस्ताक्षर व सही ते ओळखत होते, त्यामुळे प्रमाणपत्रावरील सहया व हस्ताक्षर ते ओळखत होते. त्यामुळे

प्रमाणपत्रावर काहीही अवैध्य नाही असे त्यांना वाटत होते. आरोपींना दिलेले प्रमाणपत्र खरे आहेत असे देखील फिर्यादीने मान्य केले आहे. फिर्यादीमध्ये नमुद प्रमाणपत्र क्र.०१ ते ७९ त्यांच्या सहीने दिलेले आहेत. पर्यायाने त्यांच्याकडे कामाचा कार्यभार असल्यामुळे त्यांनी फिर्याद दिली आहे. सबब, आरोपींनी त्यांच्या समान उद्देशाच्या पुर्नःसारणार्थ स्वत:च्या फायद्याकरिता बोगस बहिरेपणाचे अपंगत्वाचे बोगस प्रमाणपत्र तयार केले व ते खोटे आहे हे माहिती असताना देखील फसवणुक करण्याच्या उद्देशाने खरे म्हणुन वापरुन सी.पी.आर. हॉस्पीटलच्या प्रतिष्ठेला हानी पोहाचली ही बाब सिध्द झालेली नाही न्यायतर्क शास्त्रानुसार फौजदारी प्रकरणात संशयाच्या फायदा हा आरोपीपक्षास जातो. सदर कामी आलेला पुरावा हा संशयी स्वरुपाचा वाटतो. त्यामुळे त्याचा फायदा आरोपी पक्षास देणे न्यायोचित वाटत आहे. सदर कामातील जप्त मुद्देमाल - बहिरेपणाच्या अपंगत्वाचे प्रमाणपत्र हे लाभार्थ्यास त्यांच्या मागणीनुसार योग्य ती पुर्तता केल्यानंतर परत देण्यात यावेत व इतर मुद्देमालाची अपिल कालावधीनंतर नियमाप्रमाणे निर्गती करणे न्यायोचित वाटत आहे. म्हणुन मुद्दा क्र.०१ व ०२ चे निष्कर्ष नकारार्थी देत असुन मुद्दा क्र.०३ चे निष्कर्षाप्रत पुढील आदेश पारीत करत आहे.

## आ दे श

**०१.** आरोपी क्र.०१ ते ४८, ५० ते ५५, ५७ ते ११२, ११४ ते ११९, १२१ ते १२४, १२६, १२७, १३० ते १३२, १३४ ते १३६ यांना भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम २७८(१) अन्वये भारतीय दंड विधान संहिता कलम ४६५, ४६९, ४७१ सह कलम ३४ अन्वये गुन्ह्यातून निर्दोष मुक्त करण्यात येते.

**०२.** आरोपी क्र.४९, १२५ व १२९ हे मयत असल्याने सदरचे प्रकरण त्यांच्याविरुध्द अवसान पावले.

**०३** आरोपी क्र.५६, ११३, १२०, १२८, १३३ यांच्याविरुध्द कोणताही पुरावा अभिलेखावर न आल्याने सदर कामी त्यांना भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम २६२ नुसार भारतीय दंड विधान संहिता कलम ४६५, ४६९, ४७१ सह कलम ३४ या आरोपांतुन दोष मुक्त करण्यात येत आहे.

**०४.** जप्त मुद्देमाल - बहिरेपणाच्या अपंगत्वाचे प्रमाणपत्र हे लाभार्थ्यास त्यांच्या मागणीनुसार योग्य ती पुर्तता केल्यानंतर परत देण्यात यावेत व इतर मुद्देमालाची अपिल कालावधीनंतर नियमाप्रमाणे निर्गती करण्यात यावी.

**०५.** आरोपींचा जामीन कदबा रद्द करण्यात येतो व आरोपींना देखील मुक्त करण्यात येते.

**०६.** आरोपींनी भारतीय नागरिक सुरक्षा संहितेचे कलम ४८१ प्रमाणे प्रत्येकी रक्कम रू.१५,०००/- चा वैयक्तीक जातमुचलका द्यावा.

*(सदर न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात अधिघोषित.)*

Digitally signed by SHILPA VISHVESH KULKARNI
Date: 2026.05.16 17:46:54 +0530

( शिल्पा वि. कुलकर्णी )
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.१४, कोल्हापूर.

दि.१६/०५/२०२६.